दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २७३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.२ जानेवारी २०२३ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# किरीट सोमय्यांनी रश्मी ठाकरेंच्या १९ बंगल्यांचं प्रकरण पुन्हा उकरून काढले

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे यांच्या कथित मालकीच्या अलिबाग येथील १९ बंगल्यांचे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. यापूर्वी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी रश्मी ठाकरे यांच्या १९ बंगल्यांचे प्रकरण लावून धरले होते. तेव्हा उद्धव ठाकरे आणि शिवसेना नेत्यांनी या आरोपांचा इन्कार केला होता. मध्यंतरी या प्रकरणाविषयी सर्वचजण मौन बाळगून होते. मात्र, आता शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर अलिबागमधील १९ बंगल्यांच्या प्रकरणाचा पुन्हा एकदा तपास सुरु झाला आहे. किरीट सोमय्या यांनी नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी रेवदंडा पोलीस ठाण्यात जाऊन रश्मी ठाकरे यांच्याविरोधात तक्रार नोंदवली आहे. त्यामुळे आता पोलीस याप्रकरणात रश्मी ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करतात का, हे पाहावे लागेल. तसे घडल्यास ठाकरे कुटुंबीयांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.**



पोलिसांत तक्रार नोंदवल्यानंतर किरीट सोमय्या यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी म्हटले की, येत्या काही दिवसांमध्ये रेवदंडा पोलीस ठाण्याकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहवाल दिला जाईल. त्यानंतर येत्या सात दिवसांत रश्मी ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल होईल, असे आश्वासन मला देण्यात आले आहे. उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना त्यांनीच रश्मी ठाकरे यांच्या मालकीचे १९ बंगले रेकॉर्डवरुन गायब केले. मुख्यमंत्री कार्यालयाने यासाठी संबंधित यंत्रणेवर दडपण आणले. अधिकारी किरण पाटील यांना उद्धव ठाकरे यांनी १३ वर्षांमधील बंगल्यांचा तपशील नष्ट करण्याचे आदेश दिले. किरण पाटील हे सरकारी अधिकारी असूनही मातोश्रीसाठी काम करत होते. रश्मी ठाकरे यांनी १३ वर्षे या बंगल्यांसाठीची घरपट्टी भरली होती. परंतु, ठाकरे सरकारच्या काळात हे प्रकरण दडपण्यात आले, असे किरीट सोमय्या यांनी म्हटले.

मात्र, शिंदे फडणवीस सरकार आल्यानंतर पहिला अहवाल आला त्यामध्ये जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतीने रश्मी ठाकरे यांच्या मालकीचे १९ बंगले असल्याची बाब कबूल केली. २०२२ मध्ये दबावामुळे आम्ही १९ बंगल्यासंदर्भातील तपशील मिटवल्याची कबुली त्यांनी दिली, असा दावा किरीट सोमय्या यांनी केला. रश्मी ठाकरे यांच्या या व्यवहाराची चौकशी व्हायला हवी अशी मागणी आम्ही करणार आहोत. ज्याप्रमाणे अनिल परब यांच्या रिसॉर्टची चौकशी झाली आणि कारवाई करण्यात आली. तशीच कारवाई रश्मी उद्धव ठाकरे यांच्या विरोधात करण्यात यावी अशी आमची मागणी आहे, असेही सोमय्या यांनी सांगितले.

## आज उपसरपंचपद निवडणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील दहा ग्रामपंचायतींच्या उपसरपंच पदांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून या निवडणुका सोमवारी २ जानेवारी २०२३ रोजी होणार आहेत.

पनवेल तालुक्यातील करंजाडे, शिरढोण, शिवकर, चिंध्रन, दिघाटी, कानपोली, केळवणे, नेरे, भाताण, नितळस या ग्रामपंचायतसाठी १८ डिसेंबर रोजी मतदान झाले. तर २० डिसेंबर रोजी निकाल लागला यातून थेट सरपंच निवडण्यात आले. मात्र उपसरपंच पद हे निवडून आलेल्या सदस्यांमधून निवडले जाणार आहेत. त्यामुळे ज्यांच्याकडे सदस्यांचे बहुमत नाही अशा ग्रामपंचायतीत बहुमत मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. उपसरपंच निवडणुकीत उमेदवारांना समान मते मिळाल्यास निर्णयक मत देण्याचा अधिकार सरपंच यांना असणार आहे.

## कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत विठ्ठलनगर परिसरात चोऱ्या

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत विठ्ठलनगर परिसरात काल तीन- चार घरात चो-या करून चोरट्यांनी डल्ला मारून ३१ साजरा केला आहे. याबाबत पोलिसांकडे प्राथमिक माहिती आहे, मात्र ज्यांच्या घरी चोरी झाली आहे ते अद्याप घरी पोहचले नसल्याने नक्की काय आणि किती रुपयांची चोरी झाली आहे हे समोर आले नाही.



२०२२ ला बाय बाय आणि नविन वर्षाच्या स्वागतासाठी काल सर्वच बिझी होते, याचा फायदा उठवत नगर हद्दीतील विठ्ठलनगर परिसरात चोरट्यांनी तीन ते चार घराची कुलपे तोडून ऐवज लुटला आणि ख-या अर्थाने आपला ३१ साजरा केला आहे, या परिसरातील नागरिक यांच्या घरी चोरी झाली ते एक तर आपले नातेवाईक किंवा घरचे आजारी असल्यामुळे हॉस्पिटलमध्ये होते तर काहीजण आपल्या नातेवाईकांचे लग्न असल्यामुळे परगावी होते, थर्टी फर्स्टच्या रात्री चोरट्यांनी विठ्ठल नगर परिसरामधील तीन ते चार घरांचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून कपाट त्यामध्ये असलेले सामान अस्तव्यवस्थ टाकून कपाटात असलेल्या मौल्यवान वस्तू घेऊन पळ काढला आहे.

आपल्या घराच्या बाजूचे काल बाहेरगावी गेले आहेत मात्र त्यांचे घराचा दरवाज तोडला आहे हे लक्षात आल त्यावेळेला बाजूच्यांनी त्यांना दूरध्वनीवरून संपर्क साधून कळवले असता लक्षात आले की घर चोरट्यांनी फोडले आहे संबंधित घरांच्या चोऱ्या झाल्या आहेत त्यांच्या नातेवाईकांना संपर्क साधला असता त्यांनी थेट पोलीस स्टेशन गाठले व पोलीस स्टेशनला याबाबत माहिती कळवली घटनेची माहिती मिळतात पोलीस घटनास्थळी पोहोचले मात्र ज्या व्यक्तीची चोरी झाली आहे ती व्यक्ती घरी नसल्याने नक्की घरातील चोरट्यांनी किती आणि कोणता ऐवज पळवला आहे ही माहिती उपलब्ध झाली नाही सदर घरातील व्यक्ती ज्यावेळी घरी पोहोचेल आणि माहिती देईल त्यावेळेला प्रत्यक्ष घरात किती कोणता ऐवज चोरीला गेला आहे आणि किती रुपयाची चोरी झाली आहे ते कळेल.

## दुकानात घुसली कार, एकाचा पाय फ्रॅक्चर, गाडीचे मोठे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानांमध्ये स्विफ्ट कार शिरल्याने दुकानातील व्यक्ती जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील अजिवली परिसरात घडली आहे.

अजिवली गावाजवळ पनवेल तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीत एक स्विफ्ट कार दुकानांमध्ये शिरल्याने अपघात झाला आहे. एक वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीकडून अपघात झाल्याची माहिती असून या अपघातात दुकानातील एका व्यक्तीचा पाय फ्रॅक्चर झाला आहे त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे या अपघातात गाडीचे मोठे नुकसान झाले असून चालक ही किरकोळ जखमी झाला आहे. त्वरित घटनास्थळी पोलिसांनी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.



## देशाचे भवितव्य असलेल्या तरूण पिढीने प्रामाणिकपणा अंगीकारावा : मिलींद भारंबे

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : ९७ च्या बॅचचे नवनियुक्त नविमुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी त्यांच्याशी केलेल्या विषेश चर्चेत त्यांनी देशाचे पुढिल भविष्य असलेल्या तरूणाईला एक सरत्या वर्षाला निरोप देताना नवीन वर्षात पदार्पण करताना चांगला संदेश देताना ते म्हणाले की तरुणाईने व्यसनापसून दुर राहुन मेहनत चिकाटी व प्रामाणिक पणा हे यशाचे शिखर आहे या गोष्टी अंगीकारल्या की यश आपलेच आहे यात तिळमात्र शंका नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**सुदृढ शरिर ही खरी संपत्ती...**

नागपुर येथे बी टेक केमिकल इंजिनिअरिंग शिक्षण घेतलेले मिलींद भारंबे यांना क्रीडा क्षेत्राची खुप आवड असल्याने चक्क कराटेमध्ये ब्लॅक बेल्ट आहेत. त्याहुनही पुढील पाऊल म्हणजे एन.एस.जी दिल्ली येथे त्यांनी कंमांडोचा कोर्स देखील केला आहे. सुदृढ शरीर हीच करी आपली संपत्ती असल्याने स्वास्थ चांगले तर कामेही आपल्या हातुन चांगलीच होणार असा मोलाचा संदेशही ते नेहमी तरूणाईला देत असतात.

**पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह तर राष्ट्रपती पदकाने सन्मानित...**

त्यांनी इचलकरंजी, गोंदीया, सांगली, नाशिक, ठाणे, औरंगाबाद, तसेच राज्याची राजधानी मुंबई येथेही आपल्या कडक शिस्तीचे काटेकोर पालन करून गुन्हेगारांवर आपला अंकुश ठेवल्याने व सर्वसामान्य नागरीकांना भयमुक्त ठेवुन विविध ठिकाणी कार्यरत असताना पोलीस जततनेचे सेवक आहेत हे सत्यात उतरविल्याने सन २०१३ मध्ये मिलींद भारंबे यांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सांगली येथे सेवेत असताना जिल्ह्यात प्रथम आय.एस.ओ. पोलीस सेवा करण्यात ते यशस्वी झाले. तसेच २०१३ मध्ये त्यांच्या उत्कृष्ट कामाची पोच पावती म्हणुन त्यांना राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले.



गुन्हे गारांचे कर्दनकाळ तर सर्व सामान्य नागरीकांना न्याय या त्यांच्या ठोस धोरणात्मक दृष्टीकोनाचा नवीमुंबई आयुक्तालय क्षेत्रात सर्व सामान्यांना नक्कीच फायदा होईल. तसेच अंमली पदार्थाबाबत त्यांची कडक भूमिका असेल. नुकतेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर सेक्टर १२ मधील एका बंगल्यात सुमारे १ कोटीचे ड्रग्ज जप्त करून ६ महिला व १० पुरुष एकूण १६ नायजेरियांना खारघर पोलीस ठाण्यांतर्गत कारवाई करण्यात आली. विविध पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ विरोधी कडक आदेश देण्याचे त्यांनी या चर्चेदरम्यान सुतोवाच केले.

## कडक शिस्तबद्ध पोलीस अधिकारी अंकुश शिंदे नाशिकच्या पोलीस आयुक्तपदी

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**


**पनवेल** : अंकुश शिंदे हे पनवेलच्या परीमंडळ २ ला पोलीस उपायुक्त असताना त्यांच्या अखत्यारीत असणारी विविध पोलीस ठाण्यात कायदा आणि सुव्यवस्था याची अत्यंत कडक अंमलबजावणीचे धोरण त्यांनी पदभार स्वीकारताच आखल्याने विविध पोलीस ठाण्यात क्राईम कंट्रोल करण्यात ते यशस्वी झाले होते. त्यांच्या करारी कटाक्षामुळे विविध पोलीस ठाण्यातील हद्दीत रेकॉर्ड वरचे गुन्हेगार तसेच राजकीय पडद्यामागुन दहशत माजविणारे व समाजाला वेठीस धरणारे व्हाईट कॉलर वाल्यांची तडीपारी करण्यात त्यांनी कींचीतही कसुर केली नाही. यातुन कायदा सर्वाना समान आहे हा एक चांगला संदेश सर्व सामान्य नागरीकांत रूजला गेला.



नवीमुंबई येथुन त्यांचा कार्यकाळ पुर्ण झाल्यानंतर त्यांची बदली रायगड पोलीस अधिक्षक म्हणुन त्यांनी पदभार स्वीकारताच त्यांनी रायगडातील विविध पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष भेट देऊन तेथील वरीष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा अंती विविध गुन्हयाचा तपशीलवार आढावा घेण्यावर त्यांनी अधिक भर दिला काही वेळा तर अंकुश शिंदे हे अचानक एखाद्या पोलीस ठाण्यात भेट देत असत त्यामुळे रायगड मधील विविध पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी तत्परतेने आपले कर्तव्य पार पाडत असत. अंकुश शिंदे हे नेहमी सांगतात आपण जनतेचे सेवक आहोत सर्व सामान्य नागरीक भयमुक्त असला पाहीजे तर गुन्हेगारांवर पोलीसांचा नेहमी कडक अंकुश दरारा असला पाहीजे जे जे समाजा मध्ये तेढ निर्माण करतात जेष्ठ नागरीक, महीलावर्ग तसेच लहान मुले यांच्या तक्रारीची दखलीचा योग्य तपास करून त्याचा वेळीच निपटारा करणे क्रमप्राप्त आहे.

तसेच कायद्याचे उल्लंघन करणारे जे कोणी असतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे धाडस दाखविण्याचे काम पोलीसांकडुन झालेच पाहीजे हे करीत असताना एकही निरपराध त्यात कधीही भरडला जाऊ नये यांची काटकोरपणे काळजी घेणे हे देखील पोलीसांचे प्रथम काम आहे अशा शांत संयमी परंतु कडक शिस्तीचे कामसु पोलीस अधिक्षक रायगडला लाभल्याने रायगड मधील गुन्हाचा आलेख त्यांच्या कार्यकाळात अंत्यत कमी झाल्याचे नागरीकांतुन बोलले जात होते. रायगड पोलीस अधिक्षक शिंदे यांचा कार्यकाळ पुर्णत्वास आल्यानंतर त्यांची बदली पुणे पोलीस आयुक्तपदी झाली. शिंदे यांनी कुठेही पदभार स्वीकारला तरी त्यांच्या कडक शिस्तीबध्द धोरणात कोणताच बदल होत नाही पुण्यातही त्यांनी आपल्या कामाची धडाकेबाज सुरवात केली. कामात कसुराई करणारे अधिकारी व कर्मचारी यांना चांगलेच धारेवर धरण्यात ते कुठेही कमी पडले नाही. तदनंतर त्यांची बदली नाशिक येथे झाली नाशिक येथील पदभार स्वीकारताच त्यांनी कायदा वसुव्यवस्थेचे काटेकोर पालन करून सर्व सामान्य नागरीकांनी भयमुक्त असावे पोलीस आपल्या सेवेत सदैव तत्पर आहेत असा कार्यालयीन बैठका घेऊन संदेश देण्याचे काम प्रथम त्यांनी अधिकारी वर्गाला सुरू केले.

## तळोजा परिसरातील शेकडो तरुणांनी केला शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । तळोजा**

तळोजा परिसरातील शेकडो तरुणांनी आज नववर्षाच्या पहिल्याच दिवशी शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षात शिवसेना संपर्क प्रमुख बबनदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाने जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी पक्षप्रवेश केलेल्या तरुणांना पदांचे वाटप सुद्धा करण्यात आले.

तळोजा फेज वन-१ येतील तरुण कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये शिवसेना संपर्क प्रमुख बबनदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाने जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, महानगर प्रमुख एकनाथ म्हात्रे, तालुकाप्रमुख विश्वास पेटकर, शहर प्रमुख महेश भोईर, संपर्क प्रमुख मुरली म्हात्रे, महानगर संघटक बाळाराम मुंबईकर, विभाग प्रमुख गणेश म्हात्रे, विभाग प्रमुख मिथुन मढवी, युवासेना शहर अधिकारी तेजस पाटील, शाखा प्रमुख जगदीश मढवी, वासुदेव मढवी, कनैया मुंबईकर, सुनील मोरे, ज्ञानेश्वर भोईर, सारंग मढवी आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भाजप मधून गोमा भोईर व त्यांच्या सहकार्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

## पाली-खोपोली मार्गावरील हरपलेली सावली पुन्हा कधी?

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली-खोपोली महामार्ग हा वाहतुकीच्या व प्रवाशांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. खोपोली-वाकण महामार्ग हा मुंबई-पूणे एक्सप्रेसवेला जोडणारा एक महत्वाचा दुवा असल्याने या महामार्गावर रहदारी करणा-या वाहनांची संख्या मोठी आहे.



नियोजित स्थळी पोहोचण्यासाठी सुखकर मार्ग असल्याने प्रत्येकजण या मार्गाचा वापर करत आसतात. या महामार्गावर औद्योगिक क्षेत्र, पर्यटन स्थळे असल्यामुळे या मार्गावरून सतत वर्दळ असते. या महामार्गाच्या दुतर्फा अनेक वर्ष तग धरून राहिलेली लहान-मोठे झाडे ब-याच प्रमाणात होती. ती झाडे चौपदरीकरणाच्या कामामुळे पुर्णपणे तोडण्यात आली. शेतकरी तसेच पुणे-मुंबई-ठाणे येथून पर्यटनासाठी येणाऱ्या प्रवाशांना क्षणभर विश्रांती साठी वृक्षवल्ली उपयुक्त ठरत होती. पाली-खोपोली महामार्गाच्या रुंदीकरणाच्या वेळी अनेक झाडांची कत्तल करण्यात आली, त्यामुळे या मार्गावरील सावली पूर्णपणे नष्ट झाली आहे. नेहमी प्रवास करणारे प्रवाशी म्हाणत असतात गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी ज्या झाडांच्या सावलीत आम्ही क्षणभर विश्रांती घेऊन पुढच्या प्रवासाला जात होतो ती झाडे आता नाहीशी झाली आहेत. शासनाच्या परिपत्रकानुसार जर एक झाड तोडले तर त्या ठिकाणी चार झाडे लावायचे असा नियम आहे. पाली खोपोली महामार्गावर काम पूर्ण होत आले आहे. या महामार्गाच्या रुंदीकरणासाठी हजारो झाडे तोडण्यात आली. परंतु काम आता शेवटच्या टप्प्यात आहे. अद्यापही चार पटीने सोडा, एकही झाड लावण्यात आलेले नाही.

# एका दंतकथेचा विराम!

पेले! या दोन अक्षरांच्या शब्दात जगाला भुरळ पाडणारी जादू आहे. पेले ही एक व्यक्ती नव्हती. फुटबॉलमधील महानतेचा हा समान अर्थी शब्द आहे. जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात असले तरी त्याची महती सर्वजण जाणत होते. त्यासाठी फुटबॉलप्रेमी असावेच, अशी काही अट नव्हती. सध्याच्या भाषेत बोलायचे तर पेले खेळातील पहिले सुपर डुपर स्टार होते. खेळामुळे खेळाडू मोठा होतो, पण पेले यांनी फुटबॉलला मोठे केले. या स्टारपणासाठी प्रसिद्धी, कमाई, व्यावसायिक प्रभाव अशासारखे जे वेगवेगळे निकष वापरले जातात; त्यापेक्षाही ते जास्त देत होते. सतराव्या वर्षी पहिल्यांदा वरिष्ठ वर्ल्ड कप जिंकला. त्यांनी तीन वर्ल्ड कप जिंकले, किंवा हजारपेक्षा जास्त गोल केले. त्यापेक्षाही, त्यांची महानता जास्त होती. त्यांचा केवळ सराव बघण्यासाठी चाहते हजारो मैल प्रवास करीत. इंटरनेटचा जमाना सुरू होण्यापूर्वी पेले यांची स्पर्धात्मक फुटबॉलचा निरोपही घेतला होता. पण आज केवळ पेले हे शब्द ऑपरेट केले, तरी हजारो लेख उपलब्ध होतील. असंख्य व्हिडिओ मिळतील. पेले यांनी १९५६ मध्ये सँतोसकडून खेळण्यास सुरुवात केली; तर १९७७ मध्ये न्यूयॉर्क कॉसमॉसकडून अखेरचा सामना खेळले. पेले यांची कारकीर्द सुरू झाली, त्यावेळी जगभरात टीव्हीनेही पूर्ण जग व्यापले नव्हते. तरीही, पेले यांचा खेळ पाहण्यासाठी कोट्यवधी फुटबॉलप्रेमी शेजारच्या घरीच नव्हे तर किंवा गावातही जात असत. ना त्यावेळी सातत्याने कमालीचे कौशल्य फॉरवर्ड होत असे किंवा क्षणचित्रे सहज उपलब्ध असत. सर्व जग हातात सामावलेले नव्हते, पण पेले यांची महानता चाहत्यांच्या प्रेमातून कानोकानी सर्व सीमा पार करून पसरली. त्यामुळे, ते फुटबॉलचे सुपरस्टार नव्हे तर राजदूत झाले. ब्राझीलने पेले यांना १९७१ मध्ये 'राष्ट्रीय ठेवा' जाहीर केले, त्यामुळे त्यांना ब्राझीलबाहेरील सर्व क्लबचे दरवाजे बंद झाले. त्यांचा खेळ वर्ल्ड कप किंवा त्यांचा सँतोस क्लब परदेशात खेळणार त्यावेळीच प्रत्यक्षात अनुभवता येणार होता. पेले सुपरस्टार होते; पण ते असतानाही त्यांना संघाला महत्त्व दिले. त्यांच्या असंख्य गोलचे कौशल्य सांगता येईल, पण एका गोलने त्यांना मोठे केले, तो गोल त्यांचा नव्हता. १९७० च्या वर्ल्ड कपमधील इटलीविरुद्धच्या अंतिम सामन्यात गोलक्षेत्रानजीक असलेल्या पेले यांच्याकडे चेंडू आला. त्यांनी त्यावर ताबा घेतला. बचावपटूंनी त्यांच्याभोवती चांगलीच गर्दी केली होती. त्यांनी त्यांच्या खांद्यावरून नजर टाकली. त्यांना कर्णधार कार्लोस अल्बर्टो उजव्या बाजूने आपल्या पुढे येत असल्याचे दिसले. त्यांनी समोरील खेळाडूंकडे बघत कार्लोस कुठे जाईल, याचा अचूक अंदाज बांधत चेंडू पास केला. कार्लोस यांनी ही संधी साधली. या गोलमुळे ब्राझीलचे विजेतेपद निश्चित झाले. पेले यांनी फुटबॉल हा खेळ नाही, तर एक कला आहे, याचे प्रत्यंतर दिले होते. पेले यांनी अचूक टायमिंगचे महत्त्वही अधोरेखित केले होते. अत्यंत हलाखीत बालपण गेलेल्या पेले यांनी घर चालवण्यासाठी बूटपॉलिशही केले होते. त्यांचे कौशल्य पाहून त्यांना संधी देण्यात आली. त्यांच्या कौशल्याने अनेकजण प्रभावित झाले. त्यांनी कृष्णवर्णियांना प्रतिष्ठा दिली. आपणही जगात चमकू शकतो, हा विश्वास दिला. आज जागतिक उपविजेत्या फ्रान्स संघात एकावेळी सर्व खेळाडू कृष्णवर्णीय होते. पेले यांनी कृष्णवर्णियांना आपणही सुपरस्टार होऊ शकतो, हे दाखवून दिले. ते जिवंतपणीच दंतकथा बनले होते. पेले यांनी राजकारणापासून आपल्याला दूर ठेवले, किमान सार्वजनिक जीवनात तरी तसे दिसले. मोहम्मद अली यांनी व्हिएतनाम युद्धास विरोध करण्याचे धैर्य दाखवले, पण ते त्यांनी अमेरिकेतून केले. पेले यांनी त्यापेक्षा मोठे केले. त्यांना १९७३ मध्ये निवृत्ती मागे घेत १९७४ चा 'वर्ल्ड कप' खेळण्यासाठी दबाब आणला जात होता. आपला निर्णय त्यांनी बदलला नाही. त्यावेळी ब्राझीलचे तत्कालीन हुकूमशहा झालेले एमिलि गॅरास्ताझू मेदिसी यांच्यासमोरही ते झुकले नाहीत. त्यातून आपल्यामागे करचुकवेगिरीचा ससेमिरा लावण्यात आला. १९७४ च्या स्पर्धेत ब्राझील उपांत्य फेरीत नेदरलँड्सविरुद्ध पराभूत झाले; त्यावेळी पेले यांनी ब्राझील लीगमध्ये सर्वाधिक गोल करण्याचा पराक्रम केला होता. पेले यांचा करिष्मा निवृत्तीनंतरही कायम होता. त्यामुळे ब्राझीलमध्ये २०१४ मध्ये झालेल्या अनेक वर्ल्ड कपच्या वेळीही ते अनेक जाहिरातीत झळकले. त्यांच्यापेक्षा जास्त कमाई करण्यास फुटबॉलपटूंनी सुरुवात केली. उद्या त्यांचे विक्रमही मोडले जातील. त्यांच्या निधनानंतरही हे घडत राहील; पण 'पे-ले' या दोन अक्षरांची आख्यायिका कायम राहील. फुटबॉल शब्द उच्चारताना पेले हे नाव मनात का होईना घेतले जात राहील. जागतिक फुटबॉलवर वर्चस्व गाजवणारे अनेक खेळाडू होतील. त्यांना प्रति पेले म्हटलेही जाईल; पण पेले हे पेलेच राहतील.

# शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व डॉ. श्रीकांत शिंदे फॉउडेशनच्या उरण शहर कक्ष प्रमुखपदी चैतन्य पाटील

**दै.रायगड नगरी । उरण**

रुग्ण सेवा हिच ईश्वर सेवा मानून जास्तीत जास्त गोरगरिबांना, गरजूंना चांगल्या आरोग्य सुविधा कशा पुरविता येईल यासाठी अत्यंत तळमळीने कार्यरत असलेले व गेल्या अनेक वर्षापासून आरोग्य शिबीरे भरवून गोरगरिबांच्या आरोग्यांची काळजी घेणारे उरण तालुक्यातील चिर्ले येथील सामाजिक कार्यकर्त चैतन्य गोवर्धन पाटील यांची बाळासाहेबांची शिवसेना या पक्षांतर्गत असलेल्या शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या उरण शहर कक्ष प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे.

रुग्णसेवा हिच ईश्वर सेवा मानणारे चैतन्य पाटील हे केमिस्ट असोशिएशन उलवे चे सदस्य आहेत. शिवाय श्री समर्थ कृपा मेडिकल या नावाचे त्यांचे स्वतःचे मेडिकल सुद्धा आहे. आपल्या मेडिकल मधील गोळ्या औषधे ते गोर गरिबांसाठी फ्री मध्ये देतात. अनेक वर्षापासून आरोग्य सेवेचे हे व्रत त्यांनी हाती घेतले आहे. चैतन्य पाटील यांचे विचार व कार्य पाहून त्यांची निवड शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व डॉ श्रीकांत शिंदे फांउडेशनचा उरण शहर कक्ष प्रमुख पदी करण्यात आली आहे.

तसे नियुक्ती एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य ) यांच्या आदेशानुसार श्रीकांत शिंदे (खासदार कल्याण लोकसभा मतदार संघ )यांच्या मार्गदर्शनानुसार मंगेश चिवटे (मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष प्रमुख मंत्रालय), राम राऊत (शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र राज्य ), ज्ञानेश्वर धुलगुडे (सहाय्यक कक्ष प्रमुख महाराष्ट्र राज्य )यांच्यातर्फे चैतन्य पाटील यांना देण्यात आले.लोकांच्या वैद्यकीय समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले जाईल.विविध आजारामध्ये शिवसेना वैद्यकीय मदत कक्षा मार्फत व डॉ. श्रीकांत शिंदे फॉउंडेशन द्वारे निधी मिळण्यासाठी मदत केली जाईल.

गरजूना वैद्यकीय सुविधा मोफत मिळवून देण्यासाठी कामे केली जातील व विविध आरोग्य शिबीर राबवून लोकांना आरोग्याबद्दल व आजाराबद्दल वेळोवेळी माहिती पुरवली जाईल. असे चैतन्य पाटील यांनी माहिती दिली.

चैतन्य गोवर्धन पाटील यांची शिवसेना वैदयकीय मदत कक्ष व डॉ. श्रीकांत शिंदे फांउडेशनच्या उरण शहर कक्ष प्रमुख पदी नियुक्ती झाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# नववर्ष स्वागताच्या निमित्ताने व मंदिराच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त पनवेल मध्ये श्री भगवती साई संस्थानच्या वतीने पालखी सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नववर्ष स्वागताच्या निमित्ताने व मंदिराच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त पनवेल मध्ये आज श्री भगवती साई संस्थान च्या वतीने पालखी सोहळा पार पडला यावेळी शेकडो साई भक्त या सोहळ्यात सहभागी झाले होते.

ही पालखी मिरवणूक आज सकाळी श्री साईबाबा मंदिरातून काढण्यात आली त्यानंतर पनवेल रेल्वे स्थानक, पनवेल बस स्थानक, लाईन आळी, छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळा, सोसायटी मार्गे पुन्हा श्री साईबाबा मंदिर अशी वाजत गाजत ओम साई च्या गजरात काढण्यात आली या मिरवणुकीत श्री साईबाबाचे तसेच श्री साईबाबा नारायण चे भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# मुरुडजवळ बिबट्याच्या हल्लात गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील उडरगांवानजीक असलेल्या तिसले आदीवासी जवळील जंगलात दिलीप भोईर यांच्यावर बिबट्याने प्राण घातक हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले आहे. त्यांच्यावर मुरुड येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे.

उडरगांवाचे रहिवासी असणारे दिलीप भोईर (४५) हे सकाळी ६ च्या दरम्यान तसले आदिवासी जवळील जंगलात सुखी फाटी गोळा करण्याकरिता जात असताना अचानक दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्या मानेवर हल्ला केला. त्याच्या मागुन येणाऱ्या महिलांनी आराडाओरड केल्याने बिबट्यानी पळ काढला. मात्र हल्लयाचा प्रतिकार केल्यावर त्या झटापटीत दिलीप भोईर यांच्या मानेच्या काना जवळील जोरदार पंजाचा एक नख बसल्याने खोल जखम झाली असून त्यांना ७ टाके पडले आहेत व त्याच्या मागुन येणाऱ्या महिला मात्र सुरक्षित आहेत. ग्रामस्थ आदेश भोईर यांनी सांगितले की, या परिसरात बिबट्याचा वावर आहे. अनेक जणांना बिबट्याचा दर्शन झाला आहे. तरी बिबट्याच्या हल्लात जखमींना संपूर्ण आर्थिक भरपाई मिळावी. तसेच बिबट्याला जेरबंद करुन अभयारण्यात सोडावे अशी मागणी यावेळी केली आहे. वनपाल संतोष -रेवणे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, बिबट्यानी हल्ला केला हे आम्हाला माहीत नाही. बिबट्या आहे की अजुन कोणता प्राणी आहे त्याचा तपास करत आहोत. जखमी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची पाहणी करून विचारपूस केली आहे

# तर शिंदे-फडणवीस सरकार कोसळू शकते : आ.एकनाथ खडसे

**जळगाव । वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारवर पुन्हा एकदा निशाणा सधला आहे. शिंदे-फडणवीस सरकारच्या आमदारांमध्ये मोठी अस्वस्थता आहे. एकमेकांची उणीदुणी ते काढत आहेत. अशाच प्रकारे या सरकारमधील अस्वस्थता वाढली तर हे सरकार कोसळू शकते, अशा प्रकारची टीका एकनाथ खडसे यांनी भाजपा आणि शिंदे सरकार वर केली आहे

शिंदे-फडणवीस सरकारमधील आमदारांमध्ये एकीकडे अस्वस्थता तर दुसरीकडे पुन्हा न्यायालयाच्या निर्णयाची टांगती तलवार देखील आहे. त्यामुळे न्यायालयाचा काय निर्णय येतो यावर देखील सरकारचे भवितव्य अवलंबून आहे आणि अशाच प्रकारे या सरकारमधील अस्वस्थता वाढली तर हे सरकार कोसळू शकते, अशा शब्दात एकनाथ खडसे यांनी आपले मत व्यक्त केल आहे.

शिंदे-फडणवीस सरकारमधील प्रत्येक आमदाराला मंत्री व्हायचं आहे. त्यामुळे ते गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत. अशा परिस्थितीत ते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत आहेत. शिंदे-फडणवीस सरकारमधीलच एक मंत्री अब्दुल सत्तार यांनी ते उघडपणे सांगितलेच आहे. मात्र, त्यांनी हे कार्यकर्ते कोण आहेत आणि नेते कोण आहेत हे देखील सांगायला पाहिजे, अशा प्रकारचे वक्तव्य एकनाथ खडसे यांनी अब्दुल सत्तार यांनी केलेल्या वक्तव्य वर केले आहे.

भुसावळ तालुक्यात राखेच्या बंडाच्या कामात तत्कालीन ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यकर्त्यांनी कामे घेतल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. शिवाय काम न करता बिले काढली गेली असल्याच्या तक्रारी सुद्धा आहेत. या प्रकारची चौकशी व्हायला पाहिजे. यांच्या चौकशीसाठी आपण राज्य सरकारकडे पाठ पुरावा करणार आहेत, असेही खडसे म्हणाले. ही चौकशी होऊन त्यात जे काय समोर येईल ते जनतेसमोर आले पाहिजे आणि दोषी असणाऱ्यांवर योग्य ती कारवाई व्हायला पाहिजे, अशी मागणी एकनाथ खडसे यांनी यावेळी केली आहे.

# भेंडखळ महोत्सव 2023 चे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

श्री जरीमरी आई नवरात्रोत्सव मंडळ भेंडखळ-उरण यांच्या सौजन्याने दिनांक ०६,०७,०८ जानेवारी २०२३ रोजी उरण तालुक्यातील भेंडखळ येथे श्री विठ्ठल रखुमाई मंदिर या ठिकाणी भेंडखळ महोत्सव २०२३ (पर्व २रे) चे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ०६ जानेवारी रोजी श्री जरी मरी आई देवीचा अभिषेक, उदघाटन सोहळा,चित्रकला स्पर्धा, बेंजो स्पर्धा, महिलांचे भजन, होम मिनिस्टर, गाथा भेंडखळ गावाची, अंडरआर्म क्रिकेट स्पर्धा, दिनांक ७ जानेवारी २०२३ रोजी मॅरेथॉन स्पर्धा, कवी संमेलन, शालेय मुलांच्या स्पर्धा, हळदी कुंकू समारंभ, मंगळागौर स्पर्धा, कराटे स्पर्धा, अनुभव प्रवासाचा तर ८ जानेवारी रोजी शालेय मुलांच्या स्पर्धा, एकपात्री अभिनय स्पर्धा, सुरेल गीतांचा कार्यक्रम,सर्प प्रदर्शन, नृत्य स्पर्धा बक्षीस वितरण आणि सांगता समारोह असे विविध उपक्रम, कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री विठोबा देवस्थान भेंडखळ, महिला मंडळ भेंडखळ, भेंडखळ क्रिकेट क्लब, रा.जि.प शाळा,भेंडखळ ग्रामपंचायत व ग्रामस्थ मंडळ भेंडखळ यांच्या विशेष सहकार्याने या भेंडखळ महोत्सव-ाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाच्या अधिक माहितीसाठी श्री जरी मरी आई नवरात्रौत्सव मंडळ भेंडखळचे अध्यक्ष किरण अनंत घरत फोन नंबर ९००४७ ५५६५५ यांच्याशी संपर्क साधावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्यात अग्नितांडव, सोलापूरमध्ये फटाका फॅक्टरीत भीषण स्फोट, तिघांचा मृत्यू

**सोलापूर । वृत्तसंस्था**

नववर्षाचं स्वागत अग्नितांडवानं झालं आहे. नाशिकच्या जिंदाल पॉली फिल्म कंपनीला आग लागल्याची घटना ताजी असतानाच सोलापूर जिल्ह्यातील बार्शीमध्ये पांगरी गावाजवळ फटाका फॅक्टरीत भीषण स्फोट झाल्यानंतर आग लागली आहे. बार्शी तालुक्यातील पांगरी गावाजवळील ही घटना आहे. फॅक्टरीमध्ये फटाके बनवण्याचे काम सुरू असताना ही घटना घडली. स्फोट झाला तेव्हा फटाका फॅक्टरीमध्ये जवळपास ४० कर्मचारी काम करत होते अशी प्राथमिक माहिती आहे. स्थानिक ग्रामस्थांनी आणि अग्निशमन दलाने आग नियंत्रित केली असून फॅक्टरीमधील सर्व कर्मचाऱ्यांना उपचारासाठी बार्शी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.स्फोटादरम्यान तीन महिलांचा जाग्यावरच मृत्यू झाला आहे.तिन्ही महिलांचे मृतदेह पांगरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत.तीन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत.एका रुग्णाची परिस्थिती अत्यंत नाजूक झाल्याने त्याला उपचारासाठी उस्मानाबाद येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

बार्शी तालुक्यातील पांगरी गाव-ाजवळील एका फटाका फॅक्टरीत मोठी दुर्घटना घडली आहे. फॅक्टरीमध्ये फटाके बनवण्याचे काम सुरू असताना झाला भीषण स्फोट झाला आहे.फटाका फॅक्टरीमध्ये जवळपास ४० कर्मचारी काम करत होते. या घटनेतील जखमींना बार्शी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. स्थानिक ग्रामस्थांनी व अग्निशमन दलाने आग नियंत्रित केली असून फॅक्टरीमधील सर्व कर्मचाऱ्यांना उपचारासाठी बार्शी येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार ६ ते ७ कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत. अग्निशमन दल, पोलीस प्रशासन, आणि तहसीलदार घटनास्थळी दाखल झाले आहे.आगीचे नेमके कारण अजून समजू शकले नाहीरुग्णवाहिका घटनास्थळी दाखल असून मृतदेह व जखमींचे शोध घेत असल्याची माहिती पांगरी येथील डॉक्टरांनी दिली.

सोलापूरमधील बार्शी तालुक्यातील पांगरी गावाजवळील फटाका फॅक्टरीला आग लागली आहे. फटाका फॅक्टरीला लागलेल्या आगीला आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला स्थानिकांनी देखील सहकार्य केल्याचं दिसून आलं. अग्निशमन दलआणि स्थानिकांनी एकत्र येत आग वेळीच आटोक्यात आणली. या आगीत ६ ते ७ जण होरपळले असल्याची माहिती आहे.

पांगरी येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ वीरेंद्र पाटील यांच्याशी संपर्क साधून माहिती घेतली असता,त्यांनी सांगितले की,पांगरी येथील ग्रामीण रुग्णालयात तीन महिलांचे मृतदेह आहेत,त्यांची ओळख अद्याप पटली नाही,पोलीस प्रशासन त्याबाबत चौकशी करत आहेत.तर तीन महिला गंभीररित्या उपचारासाठी दाखल झाले आहेत. त्यांवर उपचार सुरू आहे.आगीचे नेमके कारण अजून समजू शकले नाहीत. रुग्णवाहिका शिराळे गावात घटनास्थळी आहेत,आगीच्या फुफाट्या मधून,मृतदेह आणि जखमींचा शोध करत आहेत.

# मद्यविक्रीतून साडेचौदा हजार कोटींचा महसूल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

करोनानंतर आर्थिक गाडा पूर्वपदावर आल्याने चालू आर्थिक वर्षामध्ये मद्याच्या विक्रीतही लक्षणीय वाढ झाली आहे. मद्यपींच्या मद्यसेवनामुळे राज्याच्या तिजोरीत भरघोस महसूल जमा झाला आहे. १ एप्रिल ते २६ डिसेंबर २०२२ या कालावधीत मद्यविक्रीतून मिळणाऱ्या महसूलात जवळपास ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांत महिन्यांत राज्याच्या तिजोरीत सुमारे १४,४८० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मिळालेल्या आकडेवारीतून हे स्पष्ट झाले आहे.

करोनाकाळात राज्यातील मद्यविक्री थंडावली होती. मात्र आता सर्व व्यवहार सुरळीत झाल्यामुळे मद्यविक्रीही जोमात असल्याचे चित्र आहे. गेल्या वर्षी एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत ३४.५ कोटी लिटर देशी मद्याची विक्री झाली आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या याच काळात राज्यात २५ कोटी लिटर देशी मद्य विकले गेले होते. तर एप्रिल ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत विदेशी मद्याची २३.५ कोटी लिटर विक्री झाली आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या याच काळात १७.५ कोटी लिटर विदेशी मद्याची विक्री झाली होती.

करोनाकाळात बीअरची विक्री मोठ्या प्रमाणात घटली होती. आता बीअरची मागणीही मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. एप्रिल ते नोव्हेंबर २०२२ या आठ महिन्यांत२३ कोटी लिटर बीअरची विक्री झाली आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या याच काळात २१ कोटी लिटर बीअरची विक्री झाली होती. उच्चभ्रू वर्गाची पसंती असणाऱ्या वाइनलादेखील मागणी वाढल्याचे दिसत आहे. एप्रिल ते नोव्हेंबर २०२२ या काळात राज्यात ८८ लाख लिटर वाइनची विक्री झाली आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या याच काळात ६६ लाख लिटर वाइन विकली गेली होती. २०२१-२२ या आर्थिक वर्षात राज्यात मद्यविक्रीतून १७,११७ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला होता. चालू आर्थिक वर्षाच्या केवळ नऊ महिन्यांत १४,४८० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. त्यामुळे यंदा मद्यविक्रीतून २२ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळविण्याचे उद्दिष्ट साध्य होईल, अशी आशा उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# जिल्ह्यातील आंबा बागायतदारांनी निर्यातक्षम आंबा बागांची मँगोनेट ऑनलाईन प्रणालीवर नोंदणी करावी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

निर्यातक्षम आंबा बागांच्या नोंदणीकरिता मँगोनेट ही ऑनलाईन प्रणाली दि.१ डिसेंबर पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. यासाठी अपेडामार्फत फार्म रजिस्ट्रेशन मोबाईल ॲप उपलब्ध केलेले आहे. हे ॲप डाऊनलोड करून नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. युरोपियन युनियन व इतर देशांना आंबा निर्यातीकरिता कृषी आणि प्रक्रिया खाद्य उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणच्या (अपेडा) मँगोनेट प्रणालीद्वारे निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी केली जाते. रायगड जिल्ह्यात सन २०२१-२२ मध्ये १ हजार ९७२ निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी झाली आहे. निर्यात आंबा बागांची नोंदणी ५ वर्षासाठी वैध असेल. त्यामुळे गतवर्षी नोंदणी केलेल्या आंबा बागांची नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. सन २०२२-२३ या वर्षासाठी नव्याने नोंदणी करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, ७/१२, ८ अ, बागेचा नकाशा इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत. मँगोनेटद्वारे नोंदणी करण्याची अंतिम मुदत दि.३१ मार्च २०२३ पर्यंत आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व आंबा बागायतदारांनी निर्यातक्षम बागांची नोंदणी करण्याकरिता आपल्या कार्यक्षेत्रातील तालुका कृषी अधिकारी, कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधून विहित मुदतीत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्ज्वला बाणखेले यांनी केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## महाबीज कंपनीकडून भात खरेदी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील शेतकऱ्यांना महाबीज बियाणे उत्पादक कंपनीकडून, ग्रामबिजोत्पादन योजनेअंतर्गत जया या भातपीक वाणाचे पायाभूत बियाणे उपलब्ध करून देण्यात आले होते. दरम्यान हे पीक तयार झाल्यानंतर त्याची हमीभावापेक्षा २०% अधिक दराने खरेदी करण्याचे आश्वासन, महाबीज कंपनीकडून देण्यात आले होते. त्यानुसार महाबीज कंपनीच्या कृषी क्षेत्र अधिकारी प्राची मोराळे आणि कृषी मित्र प्रफुल्ल खारपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयाच्या पटांगणात हमीभावापेक्षा जादा दराने पहिल्या टप्प्यात दहा टन महाबीजच्या पायाभूत बियाण्याची खरेदी करण्यात आली. तर उर्वरित दीड टन भात बियाण्याची खरेदी दुसऱ्या टप्प्यात केली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना प्रतिक्विंटलला अंदाजे २४७३ रुपये किमतीचा भाव देण्यात आला. यात चिरनेर मधील दहा शेतकऱ्यांनी महाबीज कंपनीला आपल्या भात बियाण्याची विक्री केली. दरम्यान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ऑनलाईन पैशाची रक्कम जमा होण्यासाठी कंपनीने शेतकऱ्यांकडून आधारकार्ड व बँक पासबुकची झेरॉक्स प्रत प्राप्त करून घेतली. परीणामी दोन दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा होणार असल्याचे महाबीज कंपनीच्या कृषी क्षेत्र अधिकारी प्राची मोराळे यांनी सांगितले होते.

## मालसई येथे क्रिकेट सामन्यांचे शानदार उद्घाटन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील मालसई येथे जे.बी.सी.ग्रुप यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट सामन्यांचे शानदार उद्घाटन ओबीसी जनमोर्चा तालुकाध्यक्ष अनंत थिटे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले. या विभागातील युवा कार्यकर्ते महेश तुपकर यांच्या विशेष सहकार्याने संपन्न झालेल्या या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी संतोष खेरटकर, महेश तुपकर, संतोष मालुसरे, चेतन मालुसरे, सुनील कोकळे, अनिल मुटके, मालसईवाडी अध्यक्ष पांडुरंग कापरे, शशिकांत कोळी, शशिकांत कोळी, अंकूश वाघमारे, बांबू कापरे, लक्ष्मण वाघमारे, लहू वाघमारे, पांडुरंग कापरे, परेश मालुसर आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. मालसई आदीवासीवाडी येथील जे.बी.सी.ग्रुप यांच्या वतीने व तालुका असोसिएशन यांच्या विशेष सहकार्याने संपन्न झालेल्या या स्पर्धेत तालुक्यातील विविध आदिवासीवाड्यांमधील संघांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून या स्पर्धेतील रंगत वाढविली.

# नववर्षाच्या स्वागतासाठी पालीत भाविकांची गर्दी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

नववर्षाच्या स्वागतासाठी अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविक मोठी गर्दी करत आहेत. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागत आहेत. त्यामुळे येथील छोट्या-मोठ्या व्यावसायिकांचा धंदा तेजीत आहे. कोरोनामुळे मागील दोन वर्षे मंदी होती मात्र आता गर्दी होत असल्याने व्यावसायिक सुखावले आहेत. पालीत हजारोच्या संख्येत भाविक व त्यांची वाहने दाखल होत असल्याने वाहतूक कोंडी होत आहे.



नाताळपासून सुरू झालेली भाविकांची गर्दी थेट जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत राहील. कारण नाताळच्या सुट्ट्या, नवीन वर्षाचे स्वागत, विविध सहली आणि २५ जानेवारीला असलेला माघी गणेशोत्सव यामुळे महिनाभर पालीत भाविकांची प्रचंड गर्दी राहणार आहे असे बल्लाळेश्वर देवस्थानचे उपाध्यक्ष वैभव आपटे यांनी सांगितले.

भाविकांची मोठी गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिक यांचा धंदा देखील तेजीत आहे. परिसरातील दुकाने, हॉटेल व लॉज ग्राहकांनी गजबजले आहेत. येथील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार, फुले व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले जय्यत तयारीत आहेत. मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत आहे. बल्लाळेश्वर मंदिर परिसरात फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक विक्रेत्या महिला विक्री करत आहेत. देवळात येणारे भाविक आवर्जून येथून हा रानमेवा खरेदी करतांना दिसतात. त्यामुळे या विक्रेत्यांचा धंदा सुद्धा चांगला होत आहे. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

खासगी वाहने, डंपर, अवजड व लक्झरी वाहनांची ये-जा, नियमांचे उल्लंघन करणारे चालक, अरूंद रस्ते व रस्त्याच्या दुतर्फा लावलेली वाहने व बांधकामे यांमूळे पालीत सतत वाहतूक कोंडी असते. सुट्टयांच्या काळात तर मोठ्या प्रमाणात पर्यटक व भाविक पालीत दाखल होत आहेत. या वाहनांमुळे पालीतील वाहतुकीवर प्रचंड ताण येवुन वारंवार अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे.बल्लाळेश्वर मंदिर परिसरात बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक देखील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तैनात आहेत. मात्र त्यांना सर्वच ठिकाणची कोंडी सोडवणे शक्य होत नाही.

## चिरनेर हायस्कूल येथे वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील हायस्कूल येथे वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वेळी विद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष पी.पी.खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, माजी पंचायत समिती सभापती भास्कर मोकल उपस्थित होते.



चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्यूकेशन सोसायटीच्या हायस्कूल येथे मागिल पाच दिवसांपासून उत्साहात सुरु असलेलेल्या वार्षिक क्रिडा स्पर्धा,व स्नेहसंमेलनाचा सांगता समारंभ विद्यासंकूलनाच्या प्रांगणात पार पडला.

त्या मध्ये गेले वर्षभर विविध प्रकारच्या स्पर्धांत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच स्नेहसंमेलनात पार पडलेल्या क्रिडा स्पर्धा व विवीध गुणदर्शन कार्यक्रमात उत्कृष्ट सादरिकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या कार्यक्रमाला पंचायत समितीच्या माजी उपसभापती शुभांगी चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष चिर्लेकर पाटील, उपसरपंच सौं. प्रियांका गोंधळी, तंटामूक्ती अध्यक्ष अलंकार परदेशी, ग्रापंचायत सदस्य रमेश फोफेरकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

## समाजातील दु:ख, वेदना अनेक आहेत, त्यावर फुंकर घातली गेली पाहिजे : प्रदीप पराडकर

**दै.रायगड नगरी । रोहा**



समर्पित भावनेने लोकोपयोगी आणि सेवाभावी कार्य केले गेले पाहिजे, समाजातील दुःख, वेदना अनेक आहेत, त्यावर फुंकर घातली गेली पाहिजे असे प्रतिपादन रा. स्व. संघाच्या जनकल्याण समितीचे राज्य कोषाध्यक्ष प्रदीप पराडकर यांनी रोहा येथे केले, जनकल्याण समितीतर्फे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या सेवारथ यात्रेचे समारोप रोहयात झाले, त्यावेळी ते बोलत होते.

गेली सात दिवस पाचशे किलोमीटरचा प्रवास करून आणि पाच हजार लोकांपर्यंत भेटी देऊन रोहयात परतलेल्या सेवारथ यात्रेचे समारोप मातोश्री मंगल कार्यालयात झाले, यावेळी व्यासपीठावर जनकल्याण समितीचे राज्य कोषाध्यक्ष प्रदीप पराडकर, मराठी पत्रकार परिषद, मुंबईचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कोंकणचे कार्यवाह अविनाश धाट, रायगड जिल्हा संघ चालक किसन घाग, समितीचे जिल्हाध्यक्ष जयेश छेडा आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्रदीप पराडकर बोलत होते, त्यांनी पन्नास वर्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, संस्कार, कृषी, पर्यावरण, स्वावलंबन, पूर्वांचल विकास, आपत्ती विमोचन आदी विषयांमध्ये समर्पित कार्य सुरू आहेत, आपत्ती विमोचनासाठी पन्नास वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या यासमितीचे स्थायी काम उभे राहिले, असे सांगताना १९९३ सालचा लातूर येथिल भुकंपा सह केरळ, कोल्हापूर, सांगली, चिपळूण आणि महाड येथिल महापुराच्यावेळी समितीने माध्यमातून केलेल्या मदतीचा आढावा घेतला.

त्याबरोबर कोरोना काळात भयावह परिस्थितीत जनकल्याण समितीने राज्यभरातील दोनशे केंद्रातून केलेल्या रुग्णसेवेची माहिती विषद केली. यावेळी रायगडचे अध्यक्ष जयेश छेडा यांनी प्रस्तावित केले, कार्यक्रमाचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, अविनाश धाट, किसन घाग यांनीही मनोगत व्यक्त केले. सेवारथ यात्रेच्या समारोप प्रसंगी प्रेरणा मुखबधिर सामाजिक संस्थेच्या सौ आठवले मॅडम, प्राणीमित्र कुमार देशपांडे, डॉ. शिरीषकुमार पेंडसे, ज्येष्ठ मुरलीधर गिंडी, वत्सराज सर आणि मोरेश्वर लिमये यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी श्रीनिवास साठे, पुरुषोत्तम कुंटे यांनी सेवारथ यात्रे दरम्यान आलेले अनुभव मांडले. निधी प्रमुख गिरीश पेंडसे, ॲड. धनंजय धारप, कोषाध्यक्ष श्रीपाद गिरधर, सौ. आरती पेंडसे, विष्णु जोशी, संजीव कवितके, भाजपा रोहे शहर अध्यक्ष यज्ञश भांड, मकरंद गोविलकर, आदींसह नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. पल्लवी दाते यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. अरुंधती पेंडसे यांनी केले. या कार्यक्रमाचे सामूहिक वंदे मातरमने समारोप करण्यात आले.

# तळोजा पोलिसांनी केला दोन ठिकाणावरून देशी दारूचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील धानसर येथील एका ढाब्यावर तसेच किरवली गाव येथील एका किराणा दुकानात तळोजा पोलिसांनी छापा टाकून मोठ्या प्रमाणात देशी दारूचा साठा हस्तगत केला आहे.

धानसर येथील एका ढाब्यावर तळोजा पोलिसांनी छापा टाकून त्या ठिकाणावरून जवळपास १७५०/- रुपये किमतीच्या देशी दारूच्या ५० बाटल्या हस्तगत केल्या आहेत.

तर दुसऱ्या गटनेते किरवली गाव येथील एका किराणा दुकानात छापा टाकून तेथून १३०० /- रुपये किमतीच्या देशी दारूच्या २० बाटल्या हस्तगत केल्या आहेत. व त्यांच्या विरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ ( ई ) प्रमाणे गुन्हा नोंदवून कारवाई करण्यात आली आहे.

# गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातील हॉल मधील सिलिंग फॅनला नायलॉनच्या रस्सीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल जवळील तळोजा फेस -२ येथे घडली आहे.

सचिन विजय जाधव ( वय ३१ ) याने राहत्या घरातील हॉल मधील सिलिंग फॅनला नायलॉनच्या रस्सीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असून याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

## आठलेवाडी येथील दत्ताराम कोदे अग्निशामक दलातून सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । गोवे**

रोहा तालुक्यातील आठलेवाडी येथील श्री. दत्ताराम कोदे यांनी मुंबई येथे अग्निशामक दलात तीस वर्षे सेवा करून ते सेवानिवृत्त झाले. मुलुंड, विक्रोळी, भायखला या ठिकाणी त्यांनी आपली चांगली सेवा करून नाव लौकिक केले. आपल्या सेवाकाळात अनेक ठिकाणी जाऊन आग विझवण्याचे काम आपल्या सहकाऱ्यांमार्फत मोठ्या शिताफिने आणि धर्याने केले.

त्यांच्या सेवापूर्तीच्या वेळी भायखळा येथे एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना निरोप देण्यात आला यावेळी दत्ताराम कोदे यांना सेवानिवृत्ती अग्निशामक दलाचे संजय मुंबरे व त्यांचे सर्व सहकारी कर्मचारी यांनी उपस्थित राहून अभिनंदन करुन पुढील आयुष्यास शुभेच्छा दिल्या.



मा.गोडसे साहेब

ॲड.संगीता चेतन मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर सो.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९५४/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.०२/०२/२०२३

१) श्रीमती.सुनिता अविनाश कांबळे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, चौ.अर्ज मधील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ यांचे वडील कै.अविनाश तुळशीराम कांबळे त्यांचे दि.१२/०५/२०२१ रोजी एमपीसीटी हॉस्पिटल, सेक्टर ४, सानपाडा, नवी मुंबई येथे निधन झाले असून कै.अविनाश तुळशीराम कांबळे यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ श्रीमती. सुनिता अविनाश कांबळे (पत्नी), २) श्रीमती.विनया अविनाश कांबळे (मुलगी) हेच कायदेशीर वारस आहेत.

कै.अविनाश तुळशीराम कांबळे यांचा ५० टक्के हिस्सा असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| मौजे | मिळकत | क्षेत्र |
|---|---|---|
| गाव-देवद, ता.पनवेल, जि.रायगड, पिन कोड नं.४१०२०६ | फ्लॅट नं.डी-३०१, तिसरा मजला, बिल्डींग नं.४, वैष्णवदेवी, नवीन सर्वे ५/०, जुना सर्वे नं.५/१ व ५/२ | ३०.०० चौ.मी. कारपेट व २०.०० चौ.मी. टेरेस |

वरील मिळकतीस कै.अविनाश तुळशीराम कांबळे यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१) श्रीमती.सुनिता अविनाश कांबळे (पत्नी), २) श्रीमती. विनया अविनाश कांबळे (मुलगी) हेच कायदेशीर वारस आहेत. वरील मिळकतीस वरील नमूद अर्जदारांची नावे लावण्याचे असल्यामुळे वरील अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरच्या अर्जास इतर अन्य कोणाचीही हरकत असल्यास अथवा अर्जदार व्यतिरिक्त अन्य कोणी कायदेशीर वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या मे.कोर्टात हजर राहून लेखी हरकत कागदपत्र व पुराव्यांसह घ्यावयाची आहे.

तरी या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, विहित मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीप्रमाणे वारसांना दाखला देण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.२८/१२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटपपत्र/करारनामा करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा/वाटपपत्र करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या करारनामा/वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार करारनामा/वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **नोड-कळंबोली** | | | | | | | | |
| १ | १० कळंबोली | आंबेतखार ३१५ | १६+१७ ते ७९+१३० ते १४१+१४७/४३८/२९२ | ०-१६-७ | १५० चौ.मी. | मौजे कामोठे, भूखंड क्र.१२२+१४९, सेक्टर २१, क्षेत्र १६३.१३ चौ.मी. (नियोजन विभागाच्या संमत सिमांकनानुसार १३.१३ चौ.मी. चे वाढीव अतिरीक्त क्षेत्र) | **दिवाणी चौकशी अर्ज क्र. सी.एम.ए.न. १९७/२००२ नुसार मुळ भूधारक कै. गजानन जानु चौधरी यांचे वारस** १. श्री. रामचंद्र गजानन चौधरी २. श्रीमती पावशीबाई गजानन चौधरी ३. श्री. दिपक तुळशीराम चौधरी ४. श्री. गणेश तुळशीराम चौधरी | निरंक |
| | | | **एकूण संपादित क्षेत्र** | **०-१६-७** | | | | |
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| २ | उलवे १२२१ | तरघर १३९ब | ७९/५ ७९/६ ७९/७ | ०-०९-९ ०-००-५ ०-०९-० | १५० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. ४०२, सेक्टर १९, क्षेत्र १४९.६५ चौ.मी. | **कै. द्वारकाबाई पांडुरंग ओवळेकर (मयत) यांचे वारस** श्री. रमेश पांडुरंग ओवळेकर | |
| | | | **एकूण** | **०-१९-४** | | | | |
| **नोड-द्रोणागिरी** | | | | | | | | |
| ३ | ६०३ | बोकडविरा ५१/८६ | १७७/७ १९१/२ | ०-२२-६ | १३०० चौ.मी. पैकी १२०० चौ.मी. | द्रोणागिरी भूखंड क्र. ३४बी, सेक्टर ४७, क्षेत्र १२०० चौ.मी. | **मुळ भूधारक कै. बाळाराम वनवास पाटील (मयत) वारस १) कै. जिजाबाई बाळाराम पाटील (मयत) २) श्री. राजेंद्र बाळाराम पाटील** | निरंक |
| | ६०३ | १९६/८७ | ३/५ ८/१ ९/३ ४७/११ ५०/१ ५३/६ ९०/५ १३४/१ १३८/९ १२२/१७ १२१/८ | ०-१२-३ | | | | |
| | ६०३ | ३१/५ | २२/२अ १२३/२अ | ०-१२-३ | | | | |
| | ६०३ | ३००/८७ | १६३/८ | ०-०२-३ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जांसह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/३८८/२०२२-२३**

# संक्षिप्त...

## आंबेवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला जिल्हास्तरीय कायाकल्प पुरस्कार जाहीर

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रायगड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्यदायी वातावरण त्याचप्रमाणे स्वच्छ व निर्मल वातावरण निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान स्तरावरील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडीला जाहीर झाला आहे.

२ ऑक्टोंबर २०१४ ला महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छ भारत मिशनला देशात सुरुवात झाली. नागरिकांना सार्वजनिक आरोग्य संदर्भात स्वच्छ व आरोग्यमय वा-तावरणात चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात या उदात्त उद्देशाने कायाकल्प पुरस्कार देण्यात येतो. शासनाकडून सार्वजनिक आरोग्य सुविधांचे स्वच्छता व संसर्ग नियंत्रण पद्धतीना प्रोत्साहन देण्यासाठी कायाकल्प पुरस्कार उत्कृष्ट उपाय योजनांवर आधारित आरोग्य केंद्रांना पुरस्कृत करण्यात येतो.

प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी संस्थेमध्ये कायाकल्प योजनेचे सर्व निकष त्याचप्रमाणे आरोग्य सेवेतील गुणवत्ता, सोयी, सुविधा, उत्कृष्ट आरोग्य सेवा त्याचप्रमाणे बायोमेडिकल उत्कृष्ट व्यवस्थापन या सर्व बाबी सातत्याने प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी ने राबविल्याचे आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्री. महेश वाघ यांनी सांगितले. योजना वेळोवेळी राबविण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अभय ससाणे यांचे मार्गदर्शन असते. प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी ला जाहीर झालेला जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचा कायाकल्प पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व डॉक्टर्स, पारिचारिका, आरोग्य सेवक, सेविका, अधिकारी वर्ग यांचे विशेष अभिनंदन होत आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# वाहतुकीचे नियम पाळणाऱ्या नागरिकांना गुलाबपुष्प देऊन केला सन्मान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अनेक हौशींकडून जल्लोष केला जातो. यात पार्टी करून मद्यपान केले जाते. यातून काही जण नशेत वाहन चालवितात. परिणामी अपघात होतात. तसेच भर रस्त्यात किंवा वर्दळीच्या ठिकाणी काही अतिउत्साही असलेल्यांकडून वादाचे प्रकार होऊन काही गुन्हे होतात. त्यासाठी पोलिसांकडून ३१ डिसेंबरला सायंकाळपासूनच मोठा बंदोबस्त केला जातो. त्यामुळे अशा मद्यपी तसेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करून त्यांची कोठडीत रवानगी होऊ नये यासाठी पनवेल शहरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे सालाबादप्रमाणे या ही वर्षी थर्टी फर्स्ट डिंसेबर रोजी क्रांतीज्योत महिला विकास फांउडेशनतर्फे पनवेल येथील ३१ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६:०० ते रात्री ८: ०० या दरम्यान आदई सर्कल सुखापूर नविन पनवेल ह्या ठिकाणी



कार्यक्रम रबविण्यात आला.

शासन नियमांचे पालन करीत वाहतुकीचे नियम पाळणाऱ्यांना, हेल्मेट घातलेले व सीट बेल्ट लावले आहेत त्यांना गुलाब पुष्प देऊन वाहतुक नियमांचे पालन करा, वाहने सावकाश चालवा असा जाणीवपुर्वक संदेश क्रांतीज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे देण्यात आला, जेणेकरून वाहन चालवताना अपघात होऊन दुर्घटना होणार नाही, जीवितहानी टळेल. तसेच आपले पोलीस बांधव -भगिनी थर्टी फस्टच्या दिवशी रात्री उशिरा पर्यंत ड्युटी करतात, त्यांच्याही भावनांचा आदर करून त्यांच्या सन्मानप्रीत्यर्थ त्यांनाही फाऊंडेशनच्या वतीने गुलाबपुष्प देण्यात आले. उपस्थित मान्यवर क्रांतिज्योत महिला विकास फाऊंडेशन अध्यक्ष श्रीमती. रुपालीताई शिंदे, संजय नाळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा पनवेल, सुभाष कोकाटे वरिष्ठ पोलीस निरीक्षक खांदेश्वर पोलीस ठाणे, विशेष भेट मा. नगरसेवक मनोज भुजबळ व सहकारी, दत्ता भोपी, सौ. रत्नमाला पाबरेकर फाउंडेशन विचुंबे विभागीय अध्यक्ष, सौ वंदना बामणे ज्येष्ठ समाजसेविका, उध्दव भुजबळ जिल्हाध्यक्ष : सावता परिषद नवी मुंबई., नितीन जाधव- अध्यक्ष श्रीसंत सावता माळी समाज विकास मंडळ कळंबोली. सचिन दळवी खजिनदार श्री संत सावता माळी समाज विकास मंडळ कळंबोली. गिरीश भोपी, सौ रुपाली भोपी, फाउंडेशन सदस्या राधिका कोळी, प्रिया. वाहतूक शाखा पनवेल पोलीस बांधव सह महिला कर्मचारी तसेच खांदेश्वर पोलीस ठाणे पोलीस कर्मचारी व महिला कर्मचारी आधी उपस्थित होते.

फाउंडेशन मधील सर्व महिलांनी हा उपक्रम यशस्वी रित्या पार पाडला.व वरिष्ठानी ह्या कार्यक्रमाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## श्री वृंदावन बाबा अय्यपा भक्तवृंदा तर्फे श्री अय्यपा मंडळी महापूजा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सलग १८ व्या वर्षी श्री वृंदावन बाबा अय्यपा भक्तवृंदा तर्फे श्री अय्यपा मंडळी महापूजा नवीन पनवेल येथे संपन्न झाली यावेळी मोठ्या संख्येने भक्तगणांनी सहभाग घेतला होता .

नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी दरवर्षी प्रमाणे यंदाही श्री वृंदावन बाबा अय्यपा भक्तवृंदा तर्फे व श्री वृंदावन बाबा भजन मंडळ पनवेल तर्फे ही महापूजा नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती.

या महापूजेत मोठ्या प्रमाणात पूजाअर्चा, महाआरती, भजन कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

समाजातील सर्व स्तरातील लोकांनी यात सहभाग घेऊन सेवा केली.

या निमित्ताने फुलांची आकर्षक आरस, दिव्याची रो-षणाई करण्यात आली होती.



## जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरे येथे स्नेहसंमेलन संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

आत्माराम ठाकूर मिशन संचलित जानकीबाई ठाकूर स्कूल, आवरे ता उरण, जि. रायगड या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुने उरण खालापूर विधानसभेचे माजी आमदार मनोहर शेठ भोईर होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की ग्रामीण भागात कमी फी मध्ये शिक्षण देवून खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम शाळा करत आहे.

कोरोना काळात पालकांची आर्थिक स्थिती लक्षात घेवून सोळा महिन्याच्या फी माफ केल्याबद्दल शाळेचे विशेष कौतुक करण्यात आले. गावातील पाण्याची टाकी ते शाळेपर्यंतचा रस्ता शासनाची निधी वापरून अथवा स्वखर्चाने सिमेंट क्रॉकीटचा तयार करण्याचे आश्वासन भोईर यांनी दिले. या



वेळी विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटीका, फैन्सी ड्रेस व गाणी सादर केली. क्रिडा क्षेत्रात ज्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले त्यांना मेडल तसेच विद्यालयातून तीन एस. एस. सी बँचेस च्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी आर्दश शिक्षक कौशिक ठाकूर, आर्दश शिक्षक महेश गावंड, सरपंच निराबाई पाटील, इंडियन आयडॉल सागर म्हात्रे, लावण्य सम्राटनी माया शिंदे, गाव अध्ययक्ष संजय गावंड, संस्थेचे खजिनदार वामन ठाकूर, सचिव अलका ठाकूर, विश्वस्त सिंधू ठाकूर व प्रसार ठाकूर,तंटामुक्ती अध्यक्ष राजेंद्र पाटील, गाव उपाध्यक्ष अशोक पाटील, नृत्यनिर्देशक सचीन पाटील, शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्षा विशाखा गावंड, रा. जि. प. शाळेचे चेअरमन राजेश गावंड व अमित म्हात्रे, ग्रामस्थ,पालक विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कायक्रमाचे सुत्र संचालन संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका कांचन थळी यांनी केले.

# वाहन पंक्चर करून अपघाताचा कट

### माजी नगरसेवक शिवाजी शिंदेंचे पोलीस प्रशासनाला निवेदन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार सध्या तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर ई रिक्षा सुरू आहेत.त्यास काही मूठभर लोकांचा ठाम विरोध आहे. त्यामुळे या ई रिक्षाला समर्थन देणाऱ्या माजी नगरसेवक शिवाजी शिंदेंच्या वाहनाला दस्तुरी नाक्यावर पंक्चर करून त्यांचा घात करण्याचा प्रयत्न अज्ञात व्यक्तींकडून फसला आहे. याबाबत शिवाजी शिंदेंनी माथेरान पोलीस निरीक्षक शेखर लव्हे त्याचप्रमाणे पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, विशेष पोलीस महासंचालक कोकण परिक्षेत्र, जिल्हा पोलीस अधीक्षक रायगड, उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत, अधीक्षक माथेरान आणि नगरपालिका प्रशासक माथेरान यांना निवेदन देऊन संबंधीत अज्ञात व्यक्ती आणि जो कोणी मुख्य सूत्रधार असेल त्यांच्यावर कारवाई करावी या आशयाचे निवेदन दि.३१ डिसेंबर रोजी सादर केले आहे.



शिवाजी शिंदेंनी निवेदनात म्हटले आहे की, माथेरान व परिसरात सामाजिक व राजकीय कार्यकर्ता म्हणून मी कार्यरत असून सामाजिक व राजकीय आकसापोटी कुणा माथेफिरू अज्ञात व्यक्तींनी मला जीवे मारण्याची तयारी केली असून मी ई रिक्षाचे समर्थन करीत असल्यामुळे मला लक्ष केले जात आहे. माझा आयशर कंपनीचा टेंपो MH46-F3930 हा माथेरानच्या दस्तुरी नाक्यावर दि.२३ डिसेंबर रोजी पार्क करण्यात आला होता माझा भाजीपाल्याचा व्यवसाय असल्याने मी दि.२९ रोजी मध्यरात्री २-४० च्या दरम्यान वाशी मुंबई इथे भाजीपाला खरेदीसाठी निघालो होतो परंतु टेंपो जवळ गेलो असता टेंपोच्या उजव्या बाजूकडील मागच्या टायरला धारदार हत्याराचा वापर करून टायर पंक्चर करण्यात आला होता. तर नुकताच माझ्या ब्रिझा गाडीचे सुध्दा नुकसान केलेले आहे. मी सामाजिक कार्य त्याचप्रमाणे व्यवसायनिमित्ताने एकटाच रात्री अपरात्री प्रवास करत असतो त्यामुळे भविष्यातील दुष्परिणाम लक्षात घेता माझ्यावर आघात होण्याचे संकेत स्पष्टपणे दिसून येत आहेत. अशा घटना भविष्यात माझ्या व कुटुंबियांच्या जीवावर बेतणाऱ्या ठरू शकतात. माझ्या वाहनांचे नुकसान करून मला शारीरिक दृष्ट्या मोठ्या प्रमाणावर नुकसान करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी संबंधीत अज्ञात व्यक्तींवर आणि यामागे जो कोणी मुख्य सूत्रधार असेल त्यांच्यावर कारवाई करावी असे माजी नगरसेवक शिवाजी शिंदेंनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक शेखर लव्हे आणि अन्य अधिकारी वर्ग याबाबत काय पाऊले उचलणार आहेत याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. माथेरान मधून ई रिक्षाला समर्थन देणाऱ्या असंख्य स्थानिक लोकांची वाहने दस्तुरी नाक्यावर पार्क असतात त्यामुळेच पुढील काळात असे प्रकार घडू नयेत यासाठी पोलीस प्रशासनाने योग्य ती काळजी घेणे गरजेचे बनले आहे. दस्तुरी नाक्यावर वाहनांमधून पेट्रोल तसेच किंमती सामान चोरी करण्याच्या घटना अनेकदा घडलेल्या आहेत.

## रोहा तालुका गणित विज्ञान अध्यापक मंडळ अध्यक्षपदी टिळक खाडे यांची सर्वानुमते नियुक्ती

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**



शिक्षण क्षेत्रातील महत्वाचे व क्रियाशील समजल्या जाणा-या रोहा तालुका गणित विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष म्हणून वांगणी हायस्कूलचे उपक्रमशील शिक्षक टिळक खाडे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे.

रोहा पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी मेघना धायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली मेहेंदळे हायस्कूल येथे संपन्न झालेल्या गणित विज्ञान अध्यापक मंडळाच्या सभेत त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी विस्तार अधिकारी रत्नाकर कनोजे व गट साधनव्यक्ती मनिषा पाटील, संगीता धामणसे व तालुक्यातील केंद्रप्रमुख व विविध शाळांतील मुख्याध्यापक उपस्थित होते.नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष म्हणून व्ही.बी.जाधव व ए. ए. रेडीज, सचिवपदी नितीन गोरीवले, सहसचिव विनय मार्गे व यतिन म्हात्रे, खजिनदार रमेश दडवे कार्यकारी सदस्य म्हणून शिल्पा मरवडे, सुमैय्या मुल्ला, प्रदीप दिवकर, विजय वेळे, एस. व्ही. जाधव, विनोद कुथे, रमजान उस्ताद, अर्चना साटम, शिवाजी मोटे, महेंद्र जवरत, भाऊसाहेब चटाले, पी. टी . लोखंडे, सुनिल घोलप, गौतम सोलंकी यांची निवड करण्यात आली. तर स्वीकृत सदस्य म्हणून रा. जि. प. चे तंत्रस्नेही शिक्षक दिपक पाबरेकर यांची निवड करण्यात आली.यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष टिळक खाडे यांनी रोहा तालुक्यात विज्ञान प्रदर्शन, विविध शिष्यवृत्ती परीक्षांची तयारी, गणित संबोध परीक्षा, शिक्षकांसाठी उद्बोधन वर्ग आदी शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा मानस यावेळी व्यक्त केला. तर नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कार्यकारिणी मंडळ व सदस्यांचे उपस्थितीतांकडून अभिनंदन व्यक करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी वाचनालयांचे लोकार्पण : दामोदर पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आजच्या डिजीटल युगात वाचन संस्कृती हरवत चालली असून तिचे जतन करण्यासाठी करंजाडे वसाहतीतील सेक्टर २ येथील मैदानावर स्व. दी.बा.पाटील साहेब जेष्ठ नागरिक सार्वजनिक वाचनालय चिंचपाडा ग्रामस्थ्यांच्या सहकार्यातून बांधण्यात आले आहे. त्या वाचनालयांचे लोकार्पण माजी सरपंच दामोदर धर्मा पाटील यांच्या हस्ते रविवारी दिनांक १ जानेवारी रोजी सकाळी करण्यात आले. यावेळी ते वाचनालयांच्या लोकार्पण कार्यक्रमात बोलत होते.




यावेळी दामोदर धर्मा पाटील माजी सरपंच, कार्यक्रमाचे अध्यक्ष अनंत शंकर केणी, माजी गाव अध्यक्ष प्रमुख पाहुणे म्हणून सी.टी.पाटील (२७ गाव उपाध्यक्ष) जगवंत परदेशी (माजी अध्यक्ष), रमेश शामजी पाटील, शशीकांत भगत, बामा केणी, चांगा भोईर, मोहन गावंड ७७ प्रभाकर गावंड, हरीचंद्र मुंडकर सावळ-राम केणी, सतीश केणी, रमेश तुराचे, परेश केणी, विठ्ठल लटके, प्रकाश केणी, जगदीश केणी, कमलाकर मुंडकर, मदन केणी, नंदकुमार केणी, एकनाथ केणी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी नऊ गावासह चिंचपाडा ग्रामस्थांचे स्थलांतर करण्यात आले आहे. त्याचबरोबर सिडकोद्वारे नव्याने विकसित होत असलेली करंजाडे वसाहतीमध्ये नागरि हक्क आणि सुविधांसाठी येथील ग्रामस्थांचा अजूनही संघर्ष सुटलेला नाही. करंजाडे वसाहतीत गार्डन, रस्ते, पाणी, खेळण्यासाठी मैदाने यांचा अजूनही आभाव आहे. सिडको या सुविधा देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचा आरोप स्थानिक करीत आहेत.

मात्र सिडकोच्या सुविधांची वाट न बघता त्याचबरोबर नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या चिंचपाडा ग्रामस्थांनी एकत्रित येत येथील वसा-हतीतील सेक्टर २ येथील मैदानावर स्व.दी.बा.पाटील साहेब जेष्ठ नागरिक सार्वजनिक वाचनालय स्वखर्चातून बांधण्यात आले आहे. यावेळी या वाचनालयामुळे व्यक्तीमत्व विकासासाठी वाचन संस्कृती अत्यंत पोषक आहे. वाचनामुळेच सुसंस्कृत समाज वाढीस मदत होणार आहे. समाजात वाचन संस्कृती वाढावी यासाठी या वाचनालयचा उपयोग होणार आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगते व्यक्त केले.

## जांबरुंग येथील आयुर्वेदिक आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कर्जत**

मुंबई येथील ज्योविस आयुर्वेद कडून तालुक्यातील जांबरुंग येथे आयुर्वेद आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. ज्योविस आयुर्वेद चे कर्जत तालुक्यातील पाचवे शिबिर यशस्वी झाले. यावेळी १५१ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून तालुक्याच्या विविध भागातील रुग्ण तपासणीसाठी आले होते. नारी सामाजिक संस्थेकडून रुग्णांना मोफत औषधे देण्यात आली. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या जांबरुंग येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये आयुर्वेदिक तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. माजी आमदार स्व तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान यांच्या वतीने ज्योविस आयुर्वेद,नारी सामाजिक संस्था यांच्या पुढाकाराने जांबरुंग कामतपाडा येथील कल्की सोशल वेल्फेअर ट्रस्ट आणि मैत्री बोध परिवार चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या माध्यमातून आयोजित शिबीराचे उद्घाटन ग्रामपंचायत सरपंच दत्तात्रय पिंपरकर आणि माजी सरपंच विश्वनाथ घुडे यांचे हस्ते झाले. यावेळी डोंबिवली येथील संजीवनी हॉस्पिटलचे डॉ. अरुण पाटील, डॉ. अंजली पाटील,




कल्की ट्रस्टचे राहुल मेहता, दौलत देशमुख, माजी आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे आदी उपस्थित होते.

मुकेश सुर्वे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व प्रास्ताविकात, 'तालुक्यातील दुर्गम भागात आयुर्वेदाचा प्रसार व प्रचार करण्याचा प्रतिष्ठानचा प्रयत्न आहे. त्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.' अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. राज सातपुते यांनी, 'आयुर्वेदाने कोणतेही दुर्घर आजार बरे होऊ शकतात. मात्र त्यासाठी नियमित औषधे घेणे तसेच पथ्य पाळणे आवश्यक आहे.' असे स्पष्ट केले.त्यानंतर डॉ. अरुण पाटील, रायगड जिल्हा परिषद शाळा जांबरुंग, कल्की तेजोमय सोशल वेल्फेअर ट्रस्ट चा सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी वसंत मोधळे, छगन ओस-वाल, पांडुरंग देशमुख, ज्योती पाटील, सानिका सावंत, बबन चव्हाण, नरेश घुडे, सुनील पोखरकर, उत्तम हरपुडे, हिरामण माने, जगदीश ऐनकर, संतोष नानोटे आदी उपस्थित होते.